१९७८ चा
महा. २०.

MAHARASHTRA ACT No. XXVII OF 1993.

THE MAHARASHTRA UNIVERSITIES (TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS OF MEMBERS OF UNIVERSITY AUTHORITIES AND OTHER BODIES) ACT, 1993.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ५ ऑगस्ट १९९३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

MAHARASHTRA ACT No. XXVII OF 1993.

AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO THE AUTHORITIES AND BODIES OF THE NON-AGRICULTURAL AND NON-TECHNOLOGICAL UNIVERSITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक ७ ऑगस्ट १९९३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

**महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** प्रत्येक कृषीतर विद्यापीठ अधिनियमात इतर गोष्टींबरोबरच, निवडून दिलेल्या सदस्यांचा समावेश असलेली निरनिराळी विद्यापीठ प्राधिकरणे किंवा मंडळे स्थापन करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे;

**आणि ज्याअर्थी,** अशा विद्यापीठांशी संबंधित कायद्याचे एकीकरण करण्याच्या, तो एकत्रित करण्याच्या व त्यात सुधारणा करण्याच्या शासनाच्या निर्णयाच्या अनुरोधाने, सन १९९२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ म्हणजेच महाराष्ट्र विद्यापीठ विधेयक राज्य विधानमंडळात

सादर करण्यात येऊन ते राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त निवड समितीकडे निर्दिष्ट करण्यात आले आहे;

**आणि ज्याअर्थी,** नजिकच्या भविष्यकाळात राज्य विधानमंडळ उक्त विधेयक संमत करण्याची शक्यता आहे;

**आणि ज्याअर्थी,** अशा प्रत्येक विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा इतर मंडळे यांमधील निवडून आलेल्या सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनाला वाटले;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ताबडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी दिनांक ३ जुलै १९९३ रोजी महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अध्यादेश, १९९३ हा प्रख्यापित केला होता; १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १०.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे, भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, १९९३, असे म्हणता येईल.

(२) तो दिनांक ३ जुलै १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे. २. मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९७४, पुणे विद्यापीठ अधिनियम, १९७४, शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४, मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९७४, नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९७४, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४, अमरावती विद्यापीठ अधिनियम, १९८३ आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "विद्यापीठ अधिनियम" असा करण्यात आला आहे.) यांमध्ये किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही परिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा करण्यात आला आहे), या कोणत्याही विद्यापीठ अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठात, विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा कोणतेही इतर मंडळ यांच्या कोणत्याही निवडून आलेल्या सदस्याचे रिक्त पद—मग ते कोणत्याही रीतीने रिक्त झालेले असो—भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही.

१९७४ चा महा. २२.
१९७४ चा महा. २३.
१९७४ चा महा. २४.
१९७४ चा महा. २५.
१९७४ चा महा. २६.
१९७४ चा महा. २७.
१९८३ चा महा. ३७.
१९८९ चा महा. २९.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याचे परिणाम.

३. कोणताही विद्यापीठ अधिनियम किंवा त्याखाली केलेले परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही विद्यापीठ अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा कोणत्याही इतर मंडळाने, उक्त कालावधीत केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, अशा कोणत्याही प्राधिकरणात किंवा मंडळात निर्माण झालेली जी रिक्त पदे निवडणुकीद्वारे भरणे आवश्यक होते ती पदे तशी भरण्यात आली नाहीत केवळ याच कारणावरून अवैध ठरणार नाही.

१९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.

सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन.

४. महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अध्यादेश, १९९३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(यथार्थ अनुवाद)

व. ग. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.